**G20 नेत्यांच्या शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान आणि ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांची भेट (21 नोव्हेंबर 2025)**

21 नोव्हेंबर 2025

माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान, श्री. अँथनी अल्बानीज यांची आज जोहान्सबर्ग, दक्षिण आफ्रिकेमध्ये G20 नेत्यांच्या शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर भेट झाली. उभय नेत्यांनी 2020 मध्ये संबंधांना सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीचा दर्जा मिळाल्यानंतर गेल्या पाच वर्षांत भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील सहकार्याच्या गहनतेत आणि वैविध्यात झालेल्या वाढीबद्दल समाधान व्यक्त केले. पंतप्रधान अल्बानीज यांनी भारतातील अलीकडील दहशतवादी हल्ल्याविषयी आपली एकजूट व्यक्त केली. नेत्यांनी जागतिक पातळीवर दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात बळकटी आणण्याची आपली बांधिलकी व्यक्त केली.

2. उभय नेत्यांनी राजकीय आणि धोरणात्मक, संरक्षण आणि सुरक्षा, ऊर्जा, व्यापार आणि गुंतवणूक, महत्त्वपूर्ण खनिजे, तंत्रज्ञान, गमनशीलता, शिक्षण आणि दोन राष्ट्रांतील नागरिकांचे संबंध यासह विविध क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य मजबूत करण्यावर चर्चा केली. परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही पंतप्रधानांनी विचारांची देवाणघेवाण केली.

3. उभय नेत्यांनी मान्य केले की उच्च-स्तरीय संपर्कांच्या वारंवारतेमुळे द्विपक्षीय संबंधांना मजबूत गती मिळाली आहे. उभय नेत्यांनी भारत-ऑस्ट्रेलिया सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीला अधिक उंचीवर नेण्याची त्यांची वचनबद्धता नवीकृत केली.

21 नोव्हेंबर 2025

जोहान्सबर्ग